स्व.राघोबाजी बाचले शिक्षण प्रसारक मंडळ, वर्धा संचलित चाणक्य स्कूल ऑफ इंटिलिजंट, मलीये ले-आऊट, पिपरी (मेघे), जि.वर्धा या शाळेचे वॉर्ड क्र.४, रिंग रोड जवळ, पिपरी (मेघे), जि.वर्धा येथे स्थलांतराबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्राशास्थ ३२१७/प्र.क्र.२७/एसएम-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २० सप्टेंबर, २०१९

वाचा :-

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांकः माशास्थ २०१२/(५९/१२)माशि-२, दिनांक ३१ जुलै, २०१३.

संदर्भ :- विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांचे क्र.प्राथ/ब/६७६९/२०१६, दिनांक १९ जुलै, २०१६ चे पत्र.

प्रस्तावना :-

स्व.राघोबाजी बाचले शिक्षण प्रसारक मंडळ, वर्धा संचलित चाणक्य स्कूल ऑफ इंटिलिजंट, मलीये ले-आऊट, पिपरी (मेघे), जि.वर्धा या इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदानित प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळेचे, वॉर्ड क्र.४, रिंग रोड जवळ, पिपरी (मेघे), जि.वर्धा येथे स्थलांतरास मान्यता देण्याचा संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

उपरोक्त शाळेचे अपुऱ्या जागेतून स्वमालकीच्या इमारतीत स्थलांतर प्रस्तावित केले आहे.

(१) स्थलांतर शुल्क रू.१०,०००/- भरणे आवश्यक राहील.

(२) सदर शाळेचे वर नमूद ठिकाणी केलेल्या स्थलांतरास खालील अटी व शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे. :-

(३) शासनाकडून शाळा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, वेतन/वेतनेतर अनुदान, विद्यार्थी इ.संदर्भात वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, आदेश इ.चे पालन करण्याबाबत तसेच शाळा अनुदानाच्या ज्या तत्वावर मंजूरी मिळाली आहे त्याच तत्वावर चालविणेबाबतचे मुळ शपथपत्र संस्थेने सादर करणे आवश्यक राहील.

(४) स्थलांतरीत शाळेची किमान पटसंख्येची अट कोणत्याही कारणास्तव शिथिल केली जाणार नाही.

(५) शासनाकडून शाळा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, वेतन/वेतनेतर अनुदान, विद्यार्थी इ.संदर्भात वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, आदेश इ.चे पालन संस्थेने करणे आवश्यक राहील.

(६) शाळेच्या बाबतीत मुळ शासन परवानगीच्या व मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाहीत.

(७) सदर शाळा मुळ ठिकाणी अनुदानाच्या ज्या तत्वावर कार्यरत होती, त्याच तत्वावर स्थलांतरीत ठिकाणी कार्यरत राहील.

(८) सदर शाळा इंग्रजी माध्यमाची कायम विनाअनुदानित शाळा असल्याने शाळेत कार्यरत शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे संपूर्ण दायित्व संस्थेवर राहील.

(९) सदरहू स्थलांतरासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी वा आक्षेप आल्यास किंवा स्थलांतरासंदर्भातील अटींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास स्थलांतर रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२. वरील अट (१) ची पूर्तता झाल्यावर, विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी सदर शाळेच्या स्थलांतरास मान्यता देण्याबाबत ४ आठवडयात पुढील कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९२०२१०८४०६७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2019.09.21 10:14:01 +05'30'

(प्रविण मुंढे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत -

१) शिक्षण संचालक (प्राथमिक/ माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे

२) विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर

३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक), जिल्हा परिषद, वर्धा

४) अध्यक्ष/ सचिव, स्व.राघोबाजी बाचले शिक्षण प्रसारकम मंडळ, वर्धा

५) निवडनस्ती (एसएम-१).